**MHKO100010842022**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३६२/२०२२.
निशाणी क्रमांक –

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकवीस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेला
श्री. म.ता.खराडे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गडहिंग्लज यांचे न्यायालयात .

| | | |
|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | २७/१०/२०२२ |
| | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | २७/१०/२०२२ |
| ३ | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | संदीप बाबुराव चौगुले, जवान, राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज |
| ४ | आरोपीचे नांव वय व पत्ता | **१. इराप्पा मारुती नवणी,** वय ४६ वर्षे,रा. निलजी, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर<br>**२. रामगोंडा आपाणा पाटील,** वय ४५ वर्षे, रा. निलजी, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर |
| ५ | आरोपीला समजावून सांगणेचा तपशील | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कम ८४ प्रमाणे |

## गुन्ह्याचा तपशिल

आरोपी क्र. १ व २ यानी दिनांक २७/१०/२०२२ रोजी ११–०० वाजताचे सुमारास नदीघाटालगत निलजी, ता. गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे सार्वजनिक ठिकाणी तुमच्याकडे मद्यप्राशनाचा परवाना नसताना दारु पिऊन धुंद असल्याचे आढळून आला म्हणून तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ८४ प्रमाणे दंडनीय गुन्हा केला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

आरोपींना आरोप वाचून दाखविणेत आले व समजाविणेत आले.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय?

उत्तर    होय

प्र. ३   तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर    मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही                                                  समोर,

गडहिंग्लज

(म.ता.खराडे)

दिनांक ०३/११/२०२२                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गडहिंग्लज

सदरचा गुन्हा आरोपीने पहिल्या तारखेस स्वेच्छेने कबूल केला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने असे कथन केले की, सदरचा गुन्हा त्यांचे हातून पहिल्यांदाच घडलेला असून आर्थिक परिस्थिती गरीबीचे असलेने कमीत कमी शिक्षा व्हावी. त्यामुळे अशा परिस्थितीत आरोपी यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप पाहता आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना दयाबुध्दी दाखविणे संयुक्तीक होणार आहे. आरोपी यांनी जप्त मुद्देमालाबाबत कोणताही हक्क सांगितलेला नाही . त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१) आरोपी क्र. १ व २ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ८४ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून प्रत्येकी रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड व दंड न भरलेस पाच (५) दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

२) प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल देशी दारु अपीलाचा कालावधी संपल्यानंतर अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवावी.

३) सदर कामातील जप्त मुद्देमाल पाण्याने भरलेल्या २ प्लॅस्टीक बाटल्या व २ प्लॅस्टीक ग्लास मुल्यहिन असल्यामुळे अपीलाचा कालावधी संपल्यानंतर कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावणेत यावी.

४) आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देणेत यावी.

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2022.11.08 13:00:37 +0530

(म. ता. खराडे )

दिनांक ०३/११/२०२२                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गडहिंग्लज